# कॉम्रेड हौसाबाई पाटील यांचे कार्य कर्तृत्व

**श्रीमती रोहिणी भाऊसाहेब कांबिरे** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**सारांश-:** सदर शोधनिबंधात एक कर्तृत्ववान स्त्री म्हणजे कॉम्रेड हौसाबाई पाटील यांच्या कार्य कर्तुत्वावर प्रकाश टाकण्यासाठी सदर शोध निबंध लिहिण्यात आला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात हौसाबाई यांनी स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिलेले आहे त्यावर प्रकाश टाकण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.क्रांती सिंहनाना पाटील यांची कन्या असणाऱ्या हौसाबाई पाटील यांनी सामाजिक बांधिलकी ठेऊन जे कार्य केले ते या ठिकाणी मांडण्यात आले आहे.

**प्रस्तावना**-:भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक थोर समाज सुधारकांचा व क्रांतिवीरांचा देश प्रेमींचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक प्रकारची देशसेवेची व समाजसेवेची कार्यकरताना स्वतःला झोकून देऊन काम करणाऱ्या महान व्यक्तीमध्ये प्रामुख्याने क्रांतिसिंह नाना पाटील यांचा उल्लेख करता येईल नानांवर महात्मा फुले विठ्ठल रामजी शिंदे आणि महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसतो अंधश्रद्धा रुढींना विरोध साक्षरता व राष्ट्रीय वृत्तीचा तुफानी प्रचार करणारे साक्षरतेचा पाठपुरावा करायला लावणारे कडवे समाज सुधारक म्हणून नानांचा उल्लेख करता येईल अशा या थोर क्रांतिकारकाच्या पोटी हौसाबाई यांचा जन्म झाला. हौसाबाई पाटील यांना आपल्या वडिलांकडून समाजसेवा देशसेवेचा वारसा लाभला त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात अनेक खडतर प्रसंगांना व समस्यांना सामोरे जाताना मागे वळून पाहिले नाही व न डगमगता अखेर पर्यंत त्या कार्य करत राहिल्या. त्यांचे जीवन कार्य हे अतिशय संघर्षमय राहिलेले आहे त्याचाच प्रस्तुत शोधणनिबंधात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्दिष्टे-:**

1. कॉम्रेड हौसाबाई पाटील यांचे जीवन कार्य अभ्यासणे.
2. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील त्यांनी दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.
3. हौसाबाई पाटील यांनी स्वातंत्र्यपूर्व स्वातंत्र्योत्तर कालखंडात केलेल्या कार्यांवर प्रकाश टाकणे.
4. हौसाबाई यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करताना त्यांच्या जीवनात घडलेल्या स्थित्यंतरांचा अभ्यास करणे.

विषय विवेचन-: क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याकडून देश सेवेचा वसा व वारसा मिळालेल्या कॉम्रेड हौसाबाई यांनी आपले संपूर्ण जीवन देश सेवेसाठी अर्पण केले होते त्यांच्या मनात देश प्रेमाबद्दल प्रचंड आस्था होती. त्यातूनच पुढे त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग नोंदवल्याचे दिसते.

**कॉग्रेड हौसाबाई पाटील** :-

क्रांतीसिहांची लेक १९४२ च्या स्वातंत्र्य लढयातील कार्यकत्या क्रांती वीरांगना हौसाबाई पाटील यांचा जन्म फेब्रुवारी १९२७ मध्ये त्यांच्या अजोळी दुधोंडी येथे झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षी त्यांच्या आईचे निधन झाले. क्रांतीसिंह स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय असल्याने भूमिगत होते. आई विना पोरक्या हौसाताई आजोळी लहानाच्या मोठ्या झाल्या. एकुलत्या एक बहिणीची आठवण म्हणून मामा बाबूराव व विठठलराव त्यांचे कौतुक करत.

हौसाबाईंचा जीवन संघर्ष :-

संकटे कधी एकटी येत नसतात. ती आपली सगेसोयरे घेवून येतात ही उक्ती हौसाताईच्या बाबतीत तंतोतंत खरी ठरली आणि वयाच्या ३ वर्षी १९३० साली आईचे निधन झाले आई नंतर कॉलराच्या साथीत आजोबा गेले .काही कालावधीतच पणजी म्हणजे नानांच्या आजीचे निधन झाले. अल्पावधीतच त्यांचे दोन्ही चुलते वारले. अवघ्या नऊ महिन्यात घरातील माणसे एकापाठोपाठ काळाच्या पडद्याआड गेली असे असतानाही देशसेवेचे व्रत हाती घेतलेले नाना भूमिगतच होते. त्यांना आपल्या माणसांचे अत्यंदर्शनही घेता आले नाही. कारण सरकारी अधिकारी त्यांना पकडण्यासाठी टपून बसले होते अशा दुःखद प्रसंगात हौसाताईंना पाठीवरून मायेचा हात फिरवणारे जवळचे कोणीच नव्हते.

खडतर प्रवास :-

बालपण हरपलेल्या हौसाताईच्या खडतर प्रवासात अधिकच भर पडली. ती नाना पाटलांना पकडण्यासाठी सरकारने जंग जंग पछाडले. त्यांची कोंडी करण्यासाठी नानाच्या राहत्या घराला सील ठोकले. जमिनीवर जप्ती आणली पाटील कुटुंबीयांचे उदर निर्वाहाचे साधन सरकारने हिरावून घेतल्याने लहान वयात हौसाताईंना आजी, चुलत बहिण, आत्या यांच्या सोबत दुसऱ्यांच्या शेतात कष्ट करावे लागले. नानांच्या कुटुंबीयांना भोगाव्या लागणाऱ्या यातना हया तर काही प्रतिष्ठित मंडळीच्या कुचेष्टेचा विषय होता.

हौसाबाईंना त्यांच्या आयुष्यात अनेक खडतर प्रसंगाना सामोरे जावे लागले. आपल्या जीवनातील प्रसंगाचे वर्णन करताना त्यांच्या अंगावर आजही रोमांच येतात. त्यांचे वडिल नाना हे गांधीजीच्या अस्पृश्यता निवारण, व्यसनमुक्ती, साक्षरता, स्त्री उध्दार यासारख्या विचारांनी प्रेरित झाले. गांधी लग्न' हे नवीन संकल्पना नानांनी अमंलात आणली यामध्ये वधू-वरांना खादीचा पोशाख

व फक्त हार घालून विवाह लावून दिला जात असे. भट व पुरोहितांशिवाय विवाह पार पडत असे. यापद्धतीने १९३६ साली नानांनी आपली बहिण गंगुबाई व मुलगी हौसाबाई यांचा विवाह १९४० मध्ये लावून दिला.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील स्वातंत्र्य लढे व आंदोलनातील हौसाबाईंचे कार्य :-

१९४० साली श्री भगवानराव मोरे यांच्याशी हौसाबाईचे लग्न झाले परंतु वर्षा दोन वर्षातच १९४२-४३ मध्ये स्वातंत्र्य आंदोलनाचा वणवा पेटला. हौसाबाईचे सासरे दोन दीर यांना अटक करून तुरुंगात टाकले. हौसाबाईचे वडील व पती दोघे भूमिगत होते. परतु अशा परिस्थितीत हौसाबाई डगमगल्या नाहीत त्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय राहिल्या.

विशेषतः भवानीनगर रेल्वे स्टेशनवर पोलिसांच्या बंदुका काढून घेवून त्या चळवळीतील लोकांना देणे व इरिगेशन बंगला जाळपोळीत त्यांनी घेतलेला सहभाग हा विशेष उल्लेखनीय व रोमांचकारी करणारा आहे. १९४६ साली पणजी जेलमध्ये स्थानबध्द असलेल्या बाळ जोशी या कार्यकर्त्याच्या सुटकेसाठी क्रांतीअग्रणी श्री. जी डी . लाड यांच्यासमवेत त्यांनी घेतलेला सहभाग स्त्री चळवळीतील एक महत्वाचा टप्पा म्हणता येईल.

तत्कालीन चळवळीतील कार्यकर्ते आप्पासो लाड, नाथाजी लाड, नागनाथ नायकवडी, जी.डी. लाड, शाहीर शंकरराव निकम श्री. रामभाऊ पवार, श्री राममाऊ लाड, श्री. गोविंद मिरगे, श्री महादेव मिरगे, श्री स्वामी रामानंद भारती इ. सानिध्यात चळवळीतील ते मंतरलेले क्षण व दिवस यांच्या आठवणी आणि दाहक कथा ऐकताना आजही त्याना दिलेला "क्रांती विरांगना" हा किताब सार्थ वाटतो.तत्कालीन पुरुष कार्यकर्त्यांबरोबरच महिला कार्यकर्त्यांचा विशेष उल्लेख करावा लागेल, त्यामध्ये लीलाताई पाटील (धुळे) सी. विजयाताई लाड, इंदुताई पाटणकर, राजुताई बिरनाळ (पाटील), शालुताई मिरगे माई पाटील गंगुताई लाड इ. कर्तबगार स्त्रियांनी हौसाताईंना मोलाचे सहकार्य केले.

स्वातंत्र्योत्तर कालखंड व चळवळी, आंदोलनातील हौसाबाईंचे कार्य :-

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताच्या स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य प्राप्त भारत हा श्रमिकांच्या, कष्टकऱ्यांचा देश म्हणून पाहिलेले स्वप्न साकार होणार तोपर्यंतच नव्या राज्यकर्त्यांनी भांडवलशाही निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला हे नानांच्या निदर्शनास आले आणि नानांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्याचा पुढाकार घेतला. या कार्यात नानांचे जावई भगवानराव मोरे (पाटील) व लेक क्रांती विरंगना हौसाबाई पाटील यांनी पक्षाचा झेंडा मोठ्या निष्ठेने हाती घेतला व अखेरपर्यंत तो सांभाळला.१९५७ साली संयुक्त महाराष्ट्राच्या काढलेल्या दिल्ली मोर्चात हौसाताईंचा सहभाग होता. १९५८ साली बेळगाव कारवार सीमाप्रश्न सत्यागृहात हौसाताई आघाडीवर होत्या. या सत्यागृहासाठी त्यांना ६ महिन्याचा कारावास भोगावा लागला. १९६५ सालच्या महागाई विरोधी जनआंदोलनात क्रांतीसिंह नाना व त्यांच्या कार्यकर्त्यांना आदोलनाच्या आदल्या दिवशीच अटक केल्याने हौसाबाई चवताळून उठल्या व त्यांनी विटा तहसील कचेरीवर सतत ७ दिवस भव्य मोर्चे काढले. १९७२ साली दुष्काळात विटा तहसील कचेरी व पंचायत समितीवरील मोर्चात त्या सक्रिय राहिल्या.

तथापि सार्वजनिक सामाजिक, राजकीय जीवनात ताईवर दि. १३ फेब्रु २००० रोजी आकाश कोसळले सुमारे ५० ते ६० वर्षे देशसेवेच्या कार्यात साथ देण्याच्या थोर देशभक्त पतीचे निधन झाले. या दुःखद परिस्थितीतून त्या सावरल्या. व समाजसेवेत मग्न राहिल्या २००१ सालच्या दुष्काळात पशुधन जगविण्यासाठी शासनाने चारा छावण्या सुरू केल्या पाहिजेत म्हणून कॅप्टन महादेव मोहिते यांच्या कार्यकर्त्यांबरोबर तीन दिवसांच्या उपोषणात हौसाताई अग्रभागी होत्याः १२ फेब्रुवारी २००३ पासून सलग एकशे-एक दिवस दुष्काळी प्रश्नावर विटा तहसील कचेरी समोर केलेल्या उपोषणात ऐतिहासिक धरणे आंदोलनात हौसाताई चे नेतृत्व महत्वाचे ठरले. १ ते २००४ रोजी पाणी संघर्ष चळवळीच्यावतीने सलग आठ दिवस देवराष्ट्रेच्या माळावर ताकारी योजनेचे पाणी ४४ कि. मी. अंतरापर्यंत सर्वांना समान मिळाले पाहिजे यासाठी ताईंनी धरणे आंदोलन केले.

**निष्कर्ष :-**महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य चळवळीत व लढ्यात अनेक स्त्रियांचे योगदान महत्वपूर्ण आहे. यात प्रामुख्याने समाजसेवेत. देशसेवेत अग्रेसर राहिलेल्या कॉम्रेड हौसाताई पाटील यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. अतिशय खडतर परिस्थितीत ताईनी अर्धशतकातून अधिक काळ सार्वजकनिक जीवनात ध्येयवादी वाटचाल केलेली दिसून येते. अनाथ ग्रस्तांच्या, दुष्काळ ग्रस्तांच्या कष्टक-यांच्या विचारांची साथ ताईंनी अद्यापही सोडलेले नाही. अत्यंत बिकट परिस्थितीतही असंख्य अन्याय व शोषणात हौसाताईंनी आपले समाजसेवेचे देशसेवेचे व्रत सोडलेले नाही, अशा थोर क्रांतीविरांगानेच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**संदर्भ सूची :-**

1) प्रा. कदम शंकरराव, प्रबोधन प्रकाशन, ज्योती प्रकाशन, पुणे फेब्रुवारी २००७.
2) सोपान गाडे, महिला राज, अविष्कार प्रकाशन, पूणे, १५ ऑगस्ट २००८
3) डॉ व्ही. वाय. सोनवणे, प्रा. सुरेश भालेराव महिला आणि मानवी हक्क, प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव, १२ मार्च २०१४
4) प्रा. व्ही. बी. पाटील, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, के-सागर
पब्लिकेशन्स पूणे. २००४.